# अभिरुची

**मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र.**

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.

**एप्रिल २०१४**

## या अंकात


- अध्यक्षीय
- माझा जगप्रवास - काही क्षणचित्रे
- स्वागत नव वर्षाचे - गुढी पाडव्याचे महत्त्व
- जपानी आजी
- पाककला
- कविता
- शब्दकोडे
- विनोद
- कौतुक
- परिचय
- Our sponsors

## अध्यक्षीय



नमस्कार मंडळी सर्वप्रथम पाडव्याच्या आपणा सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!, मराठी मंडळ सॅक्रामेंटोच्या पहिल्या त्रैमासिक वृत्ताचे मी स्वागत करतो. आधुनिक जगातील facebook/whatsapp/email ह्या प्रकारची संपर्क करायची साधने दैनंदिन जरी उपलब्ध असली तरी ह्या वृत्तपत्राच्या सहाय्याने जी काही आपल्या समाजाबद्दल लिखाण आणि वाचन करायची संधी तुम्हा आम्हा सर्वांना मिळेल त्याचा आनंद काही न्याराच असेल अशी मी अपेक्षा करतो.

ह्या वर्षाच्या हौशी समितीने घेतलेल्या नव्या उपक्रमांची माहिती, मंडळाच्या आत्तापर्यंत झालेल्या कार्यक्रमांची माहिती व मंडळाची सद्य स्थिती वगैरे माहिती एका ठिकाणी संकलीत व्हावी, इतकेच नव्हे तर कोणाला लेख, कविता, प्रवास वर्णन, पाककृती या विषयावर मराठी किंवा इंगजी भाषेत लिहून सर्वांना प्रसिद्ध करून सांगाविशी वाटली, शाळा व मंडळातील मुलांच्या गुणांचे कोडकौतुक, व नुकतीच इथे नवीन आलेल्या कुटुंबांची किंवा इथे शिकण्यासाठी आलेल्या विद्यार्र्थ्यांची ओळख, केवळ ह्या वृत्ताच्या मार्फत व्हावी त्यासाठी केलेला हा खटाटोप.

ह्या वृताच्या माध्यमातून मुख्यत्वे सर्वांना आणखी एका गोष्टीची जाणीव करून द्यायची आहे ती म्हणजे आपल्या समाजातील काही बोटावर मोजता येतील अशी उत्साही मंडळी, जी आपली दैनंदिन नोकरी, कामकाज, कौटुंबिक जवाबदारी सांभाळून, हे मंडळ सतत कार्यरत राहावे ह्यासाठी धडपड करीत असतात त्यांनी केलेल्या कार्याची जाणीव आपल्या समाजाला करून द्यावी. मंडळाच्या कार्यक्रमांसाठी उपस्थिती वाढावी की जेणेकरून कार्यकर्त्यांच्या परिश्रमांचे चीज व्हावे, त्यांना आणखीन जोमाने कार्य करण्यास स्फुरण मिळावे. मंडळाच्या कार्यक्रमातून मंडळाला प्रत्येक वेळेला तोटाच सहन करावा लागतो याला बरीच कारणे आहेत. कुठलाही अगदी साधा कार्यक्रम करण्यासाठी केवळ event fees वर भागत नाही तर sponsorship ही लागतेच, तर ह्या वृत्ताच्या माध्यमातून sponsors कोण आहेत ह्याची सर्वांना कल्पना येइल. त्यांच्याद्वारे मंडळाला आर्थिकदृष्ट्या हातभार लागेल. तुमचा पाठींबा आणि सर्वांच्या सहकार्यानेच प्रगती शक्य होणार आहे. आपला समाज एकत्रित राहण्यास मदत होणार आहे. कृपया आपणा सर्वांचे भरघोस सहकार्य करण्याचे आवाहन करून मी हा लेख संपवतो .

जय हिंद जय महाराष्ट्र!

विक्रांत सावंत (अध्यक्ष, मराठी मंडळ सॅक्रामेंटो )

## माझा जगप्रवास - काही क्षणचित्रे



### पद्माकर शेंडे

Enjoy these Dubai and Abu Dhabi pictures that show world's tallest building"Burj Khalifa" in Dubai and world's largest Swarovsky Crystal Chandelier in world's second largest Sheikh Zayed Mosque in Abu Dhabi. I have hundreds of pictures and stories to share for upcoming newsletters, so follow me on MMSAC newsletter ☺








[click on picture to enlarge]

## स्वागत नव वर्षाचे - गुढी पाडव्याचे महत्त्व



मदन सावंत



ब्रम्ह देवाने हे जग चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी निर्माण केले, असे पुराणात सांगितलेले आहे त्यामुळे विश्वाचा वाढदिवस या गुढी पाडव्याला साजरा केला जातो. गुढी पाडवा हा साडेतीन मुहूर्तातील एक सण मनाला जातो या दिवसासंबंधी विविध आख्यायिका प्रचलित आहेत. गुढी पाडवा म्हणजे नवी सुरवात या निमित्ताने जुने टाकून नवे घेण्याचा आरोग्यदायी संकल्प आपण सगळ्यांनी करायला हवा. गुढी पाडवा हा सांस्कृतिक पौराणिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्व प्राप्त झालेला सण आहे त्यामुळे ह्यामागील उद्देश समजून घेऊन तो साजरा करणं उचित ठरतं. मोठ्या तांब्याला लांबलचक बांबू, त्याला पांघरलेली शाल, गाठी, फुलाचा भरगच्च हार हे सारं गुढी पाडाव्याचे दृश्य प्रत्येकाच्या उंबरठ्यावरून दिसून येते. सणाचे महत्व अजून तितकंच भाव मनामध्ये घर करून बसलं तरीहि ह्याचं रूप काही छोटं होवू लागलयं. गेल्या दशकापूर्वी गुढी पाडव्याचा सण म्हटलं की डोळ्यासमोर यायच्या त्या फक्त ग्यालरीत उभारलेल्या गुढ्या आणि बँक हॉलीडे. पण आता गुढी पाडवा म्हणताच डोळ्यासमोर येतात त्या शोभा यात्रा. गुढी पाडव्याच्या दिवशी घरी गोडधोड केलं जातंच. श्रीखंडपुरी पुऱ्या वगैरे आपण एरव्ही घरी करतो, पण या गुढी पाडव्यासाठी वाटाण्याच्या पुऱ्या आणि श्रीखंड असा बेत करतो. चैत्राचं वर्णन करणारी आणि चैत्र महिन्यापासून सुरु होणाऱ्या ऋतूचे गुणगान गाणारी अनेक पदं आपल्या मराठीत आहेत. गाण्यामधून आलेल्या वसंत ऋतूचे वर्णनही तितकंच बहारदार आहे. वसंत हा ऋतू राजा मधुमास म्हणून ओळखला जातो. विविध रंगांनी नटलेल्या सृष्टीचा साजशृंगार आपल्याला याच महिन्यात अनुभवायला मिळतो. हिरव्यागार कैऱ्यां केशराच्या काड्यांनी सजलेल्या थंडगार पन्हयात विसावल्या किवा मोहरीची कडक फोडणी घातलेल्या चटकदार वाटल्या डाळीच्या रूपाने पुढ्यात आल्या की चैत्र दाराशी आल्याची खूण पटते (thanks to Wrushasen Dakhane for help with typing this article in Marathi)

## जपानी आजी



**विक्रम बोबडे**

साधारण बारा वर्षांपूर्वी मला पहिल्यांदा जपानला जायचा योग आला. सुरूवातीला जे काम एका महिन्याचं आहे असं वाटलं होतं ते तीन महिन्यांपर्यंत वाढलं आणि नंतर तीन-तीन महिन्यांच्या खेपा होऊन जवळ जवळ दोन वर्ष मला जपानला काढावी लागली. त्या संपूर्ण काळात माझं वास्तव्य कशिवा ह्या साधारणतः चार लाख लोकवस्तीच्या छोटेखानी शहरात होतं. कशिवा शहर हे तोक्यो (Tokyo चा खरा उच्चार हा तोक्यो असा आहे, टोकीयो नाही!) च्या उत्तरपूर्वेला तीस मैलांवर चिबा प्रेफ़ेच्चर मध्ये आहे. संपूर्ण जपान हा ४७ प्रेफ़ेच्चरस मध्ये विभागला गेला आहे. तर ह्या कशिवा मध्ये माझा मुक्काम "कशिवा दाइच्चि" (म्हणजे "नंबरवन इन कशिवा") ह्या हॉटेल मध्ये होता. जपान्यांना कदाचित "नंबर १" चं फार आकर्षण असावं, कारण तिकडे नावात "दाइच्चि" असणारे बरेच बिझनेसेस आणि प्रोडक्टस तुम्हाला आढळतील. आपल्या गोविंदाचे "नंबर १" सिरीजचे टुकार चित्रपट डब करून तिकडे हातोहात खपवता येतील. बाकी आपल्या साउथइंडियन सुपरस्टार रजनीकांतचे डब केलेले सिनेमे तिकडे भरपूर गल्ला कमावतात बरं का! आपली आणखी एक गोष्ट जपान्यांना आवडते आणि ती म्हणजे मसालेदार भारतीय जेवण. तिकडच्या इंडियन रेस्टोरण्टस मध्ये जपानी हमखास "कराई देसू ने!" (म्हणजे "स्पाईसी आहे") किंवा "ओईशी देसू ने!" (म्हणजे "चविष्ट आहे") म्हणतांना दिसत. कशिवा दाइच्चि हॉटेलपासून अगदी पायी चालण्याच्या अंतरावर पाच-सहा इंडियन रेस्टोरण्टस होती.

दाइच्चि हॉटेल एका कुटुंबाच्या मालकीचं होतं. इमारतीच्या खालच्या मजल्यावर समोरच्या भागाला फ्रंटडेस्क आणि जपानीज रेस्टोरण्ट होतं तर मागच्या भागाला जोडून त्या कुटुंबाचं घर होतं. हॉटेलच्या गिऱ्हाईकांची राहण्याची व्यवस्था वरच्या मजल्यांवर होती. त्या हॉटेलचा कारभार मुख्यत: त्या कुटुंबातील पन्नाशीच्या आसपास असलेली एक स्त्री सांभाळत असे. त्या बाईला मोडकं-तोडकं इंग्रजी येत होतं. कधी-कधी तिचा नवरा फ्रंटडेस्कवर दिसे पण त्याची इंग्रजी OK आणि NG ह्या दोन शब्दांत संपत होती. जपान मध्ये NG (No Good) खूप प्रचलित आहे. जे OK नाही ते NG आहे ! आणि ते खुणेने सांगायची पण एक विशिष्ट पध्द्त आहे. दोन्ही हात एकमेकांवर ठेवून इंग्रजी अक्षर एक्स बनवायचं आणि ते म्हणजे NG ! तर त्या कुटुंबात नवरा-बायको शिवाय त्यांची मुलं आणि एक म्हातारी आज्जीबाई होती. ती म्हातारी त्या कुटुंबातल्या माणसाची आई होती. तिचं वय साधारणत: सत्तर-पंचाहत्तर असावं. गोरा

रंग (काळा-सावळा जपानी माणूस अजून जन्माला यायचा आहे!), साधारण उंची, डोळ्यावर चष्मा, काळेभोर केस आणि चेहेऱ्यावर वयोमानाप्रमाणे आलेल्या सुरकुत्या पण तरीही टवटवीत दिसणारी ती आज्जी कधी फ्रंटडेस्कवर असायची तर कधी त्या हॉटेल मधल्या रेस्टोरण्ट मध्ये नोकरवर्गाला सूचना देत असताना दिसायची. तिथं आलेल्या गिऱ्हाईकांची अगदी प्रेमाने चौकशी (अर्थातच जपानीभाषेतून!) करतांना दिसत असे. दुपारी जेंव्हा वर्दळ कमी असायची तेंव्हा ती तिथल्या महिला कर्मचार्यांशी गप्पा मारत असे. मोलकरणीशी सुद्धा प्रेमाने बोलणारी आपली भारतीय आजीच जणू! तिच्या बोलण्यात मार्दवता होती आणि नोकरवर्गाशी बोलतांना सुद्धा ती अदबीने बोलत असे. ती कधी फ्रंटडेस्कवर असेल तर न चुकता मला जपानी भाषेत अभिवादन करत असे. कधी "इरोशैईमसे.." (welcome), कधी "कोन्निचिवा.." (hello) तर कधी "ओहायो गोझैईमसु!" (good morning) असं प्रेमळ स्वरात तिचं अभिवादन कानावर पडत असे आणि मीही तिला "अरिगातो गोझैईमसु!" म्हणून धन्यवाद देत असे. हळुहळू मी ही मोडकं-तोडकं जपानी बोलायला शिकलो आणि मग "ओगेन्की देसू का?" (How are you doing?) अशी तिची चौकशी करू लागलो. एकदा ऑफिसला निघायाच्या वेळेस पाऊस पडतं होता म्हणून मी फ्रंटडेस्कवर तिच्याकडे "कासा अरीमासू कां?" (छत्री आहे कां?) असं विचारलं आणि तिने "अरीमासू ने!" म्हणून आतून एक छत्री आणून दिली. त्यानंतर जेव्हा जेव्हा बाहेर निघायच्या वेळेस पाऊस पडतं असेलं तेव्हा तेव्हा ती न चुकता "कासा ने!" म्हणुन छत्री काढून देत असे. रात्री ऑफिस मधून हॉटेलवर परतल्यावर करण्यासारखं काही नसे. टीव्ही असून नसल्यासारखा आणि इंटरनेटची सोयपण नव्हती त्यामुळे मी एकदा फ्रंटडेस्कवर इंग्रजी वर्तमानपत्राची चौकशी केली आणि माझ्या सुदैवाने त्यांच्याकडे ते होतं. कदाचित आमच्यासारख्या परदेशी पाहुण्यांसाठीच ते मागवलं जात असावं. कारण सर्वसामान्य जपानी माणूस अणुबॉब नंतर सगळ्यात जास्त कशाला भीत असेल तर ते इंग्रजीला! ते इंग्रजी वर्तमानपत्र त्यानंतर माझ्यासाठी राखून ठेवलं जात असे. रात्री ऑफीसमधून परत आल्यावर ती आजी "शिमबून ने!" म्हणून ते वर्तमानपत्र काढून देत असे. जसजसा माझा जपानी शब्दसंग्रह वाढत होता तसतसा मी तिच्याशी जास्तीतजास्त बोलायचा प्रयत्न करत होतो आणि तिलाही त्या गोष्टीचं फार कौतुक वाटत असे. कधी-कधी ती मला एखादं संत्र देत असे. आजीने आपल्या नातवाला दिलेला खाउच तो! मला ही सकाळी ऑफिसला तिचा निरोप घेवून निघताना अगदी घरच्या आजीला "येतो गं!" म्हणून निघाल्यासारखं वाटे. मधून मधून रविवारी ती आजी आणि तिची सुन मला त्यांच्या जपानीज रेस्टोरण्टमध्ये जेवायला बोलावत असे. मी शाकाहारी आहे म्हणून खास शाकाहारी मेनू माझ्यासाठी बनवला जात असे. एकदा मला दातदुखीचा त्रास होऊ लागला आणि मी आजूबाजूला कोठे दातांचा दवाखाना आहे कां हे विचारण्यासाठी फ्रंटडेस्कवर गेलो तर तिथे ती आजी होती. मी खाणाखुणा करून तिला समजवायचा प्रयत्न केला की माझा दात दुखतो आहे आणि मला डॉक्टरकडे जायचं आहे. माझ्या खाणाखुणा आणि "इताई इताई !!" (दुखः) ह्या शब्दांमुळे तिला समजलं की मला काय म्हणायचं आहे. तिने लगेच तिथल्या एका महिला कर्मचाऱ्याला मला डॉक्टरकडे घेऊन जाण्याची सूचना केली. दुसऱ्यादिवशी मी दिसल्यावर तिने माझी आवर्जून चौकशी केली आणि "आता त्रास कमी आहे का?" विचारलं. मी ही "दाईजोब देसू ने" (बरं आहे) म्हणालो. नंतर एकदा भारतातून मी तिच्यासाठी गणपतीची मूर्ती आणि काश्मीरी शाल भेट म्हणून आणली. त्या भेटवस्तु घेतल्यावर तिने मला दहादा "अरिगातो ने" म्हणून धन्यवाद दिले. काही दिवसांनी तिने मला बोलावून घेतले आणि एक छानशी जपानी भेटवस्तू मी नको-नको म्हणत असतानाही मला दिली.

एका रविवारी ऑफिसमधला माझा एक जपानी मित्र मला भेटण्यासाठी हॉटेलवर आला तेव्हा मी त्याला माझ्या जपानी आजीची ओळख करून दिली. ते दोघे जपानी भाषेत थोडावेळ बोलले. माझ्या मित्राने नंतर मला ती काय म्हणाली हे इंग्रजीत सांगितले. ती माझ्या मित्राला म्हणाली होती कि तुझा हा भारतीय मित्र फार हुशार आहे. सर्वसामान्य जपान्यांच्या मनात NEC, हिताची, होन्डा, टोयोटा ह्यासारख्या जपानी कंपन्यांबद्दल फार आदर आहे. त्यामुळे NEC सारखी सुप्रसिद्ध जपानी कंपनी माझ्यासारख्या परदेशी तंत्रज्ञाला सारखंसारखं बोलावून घेते ह्यावरून कदाचित तिची ही (गैर) समजूत झाली असावी. जपान सारख्या ठिकाणी जिथे भाषेच्या अडचणीमुळे ऑफिसमध्ये सुद्धा नीट संवाद साधता येत नव्हता तिथे अशी प्रेमळ आजी मिळावी हे फारच अनपेक्षित आणि सुखावह होतं.



**[फोटो : जपानी आजी (उ.) आणि तिची सून (डा.)]**

**National Volunteer Week, April 6-12, 2014, is all about appreciating, recognizing and encouraging volunteers to engage in their communities.**

**MMSAC committee thanks all volunteers including Marathi Shala teachers, and parents who volunteer their places for conducting Shala classes, from the bottom of our hearts.**

## पाककला



### वैशाली आदितवार

## Green Apple Phirni

This dish is yummy treat for sweet lovers. It contains the goodness of kesar, pista, elaichi, milk, apple etc. All of these combined give it a rich flavor. Here is the recipe.

**Ingredients**

2% milk – 3 cups

Rice, soaked – 3 tablespoons

Saffron – a few strands

Pistachios – 3-4

Sugar – 11/2 tablespoons

Green cardamom powder – ¼ teaspoon

Green Apple- 1 no.



**Method**

1. Drain and grind the rice coarsely.
2. Boil milk lower the heat and let it simmer till it gets little think (Alternatively fat free half & half can be used just boil it).
3. Soak saffron in one tablespoon of milk. Blanch pistachios, peel and cut into slivers.
4. Add rice paste to the milk and cook stirring continuously so that there are no lumps.
5. Add sugar and mix. Add green cardamom powder, saffron milk and mix. When the mixtures starts thickening take it off the heat.
6. Pour it in a bowl and cool for 10 mins.
7. Peel apple and cut them into ½ inch cubes. And add apples to the bowl and give a quick stir. Leave it covered for ½ hr outside so apples get cooked in warm phirni.
8. Garnish with pistachio slivers, cover and keep it in the refrigerator to chill.

Serve chilled.

.

## कविता

 **अमिता खरे**

# आयुष्यास

तू कशाला टाकतोस उलटे फासे
मी कुठे तुझ्याशी शर्त लावली होती

थोडा हट्ट तुझा, थोडा माझा हेका
चल करु समझोता, उगा भांडावे किती

आता जरा कुठे पालवी फुटु लागली
तुझ्या ग्रीष्माची झळ सोसावी कशी?


दिवस सरता मागशील जमा-खर्च सारा
मला कुणी नफ्याची गणिते शिकवली होती?

दूरातून साद आली एका वेड्या गाण्याची
न ऐकण्याचे बहाणे करावे किती?

## शब्दकोडे



**अजित नातू**



आडवे शब्द : (१) थाटमाट, भपका (४) पारध (७) ओळ, रांग (८) हाताखालचा, दुय्यम (९) सूक्ष्म कण (११) फाटक, कवाड (१३) शिलाईमधील गाठ (१५) पायली या मापाचा चौथा भाग (१६) रस्ता, पथ (१८) एकच प्याला या नाटकाचा नायक (२०) कावीळ (२१) फेरी, हेलपाटा (२२) अरबी वर्षाचा सातवा महिना (२४) थेट, कुठेही न थांबता इच्छित स्थळी (२८) समविचार लोकांचा कंपू (२९) पांढऱ्या पायांचा काळवीट (३२) कानाच्या आकाराची मोठी करंजी (३४) दुसऱ्याच्या मनातले भाव अचूक ओळखणारा (३७) वेतन, पगार, मेहनताना (३८) अलंकारात बसविलेले रत्न (३९) तहकूब

उभे शब्द : (१) लाल भोपळा (२) एक चर्मवाद्य (३) काळे मीठ (५) बांगड्या विकणारा; तळे (६) पाळी (८) ओसाड जागा (१०) केसांच्या जटा झाल्या आहेत असा (११) पर्वा, फिकीर (१२) फैसला, निकाल (१४) कावळा, काग (१७) त्रास, दगदग (१८) सौभाग्यवती, सवाष्ण (१९) धातूचा द्रव (२३) कंगवा (२५) पायाच्या घोट्यापर्यंत लांबीचा कोट (२६) कर्णा (२७) मनुष्य, माणूस (३०) सान, बारीक (३१) मृत्युदेवता (३२) काठीच्या टोकाला चिंध्या गुंडाळून केलेले उजेडाचे एक साधन (३३) एक हिंदू जमात (३५) हाता-पायांच्या अग्रावरील टणक भाग (३६) वर्चस्व, कुरघोडी

**send a scanned copy of completed shabdacode to ajit_natu@hotmail.com.**

## विनोद - अजित नातू

**निरीक्षण:**
( अपघात झालेल्या महिलेस ) पोलिस : बाई , आपल्याला धडक देउन गेलेल्या मोटारीचा नंबर आपण पाहीलात का?
बाई : नंबर काही लक्षात नाही पण त्या मोटार चालवणाऱ्या बाईने हिरवी साडी नेसली होती , तिच्या गळ्यात मोत्याची माळ होती , आणि तिच लिप्स्टिक मात्र तिला मुळीच शोभुन दिसत नव्हतं

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते म्हणे!

यात आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे?

बायकांना कधी अपयशी पुरुषांच्या मागे धावताना पाहिलंय का कुणी?!!

**सर्व कार्यक्रमांची छायाचित्रे पाहण्यासाठी भेट द्या**

**http://mmsac.org**

**Renew Membership for Year 2014 by clicking here**

**Visit MMSAC Website for more!**

Upcoming Events

Donate or Pay Membership

Pay Event Fees

Like us on Facebook

### We need Volunteers for Upcoming Events

Contact committee@mmsac.org

Maharashtra Din/Padwa – May 2014

Music/Talk show - May 2014

Picnic – July 2014

India Day – August 2014

Camping – August 2014

More events for the next quarter to be announced soon..

**Upcoming Event**

### Maharashtra Din, Gudhi Padwa

**On May 3rd 3:30pm to 8pm**

**At Rancho Cordova City Hall**

**2729 Prospect Park Drive**

**Rancho Cordova, CA 95670**

# कौतुक



**AMEYA DHUMAL's** (son of Pallavi and Ashish Dhumal) entry 'I Believe I can Fly' at PTA Reflections competition themed 'Believe Dream Inspire' won Honorary award at Third District PTA CA



## PAINTING FROM SHARAYU KULKARNI





[click on painting to enlarge]

Share pictures from your recent awards, achievements, recognition, and graduation ceremony


Shala teachers, and parents, share pictures from Marathi Shala classes

# परिचय

Namaskar MMSAC members,

Let me introduce myself and my family, I am **Wrushasen Dakhane** recently moved to Sacramento working as an IT consultant in downtown. My wife **Priya Dakhane** (Physiotherapist) and our cute little daughter **Urvi Dakhane**.

We moved to US after spending 4 years in Singapore, to explore higher career challenges.



Recently moved to Sacramento? Introduce yourself to Mandal members

# Our Sponsors

## Platinum sponsors

In the Nation, what matters to us is what matters to you.



When it comes to protecting what you love, it's not what you know, but who you know. Someone who cares about what you care about. At Nationwide Insurance, we call them agents. You'll call them friends. We put members first, because we don't have shareholders.

**Join the Nation where protection is personal.**

Join me in Folsom.
**Jay Jayaraman**
The Jay Jayaraman Insurance Agency
(916)668-8000
jayarj2@nationwide.com

**Nationwide®**
Insurance

*Nationwide is On Your Side.®*

Products underwritten by Nationwide Mutual Company and Affiliated Companies, Columbus, Ohio. Not all Nationwide affiliated companies are mutual companies and not all Nationwide members are insured by a mutual company. Nationwide, Nationwide Insurance, the Nationwide framemark, Nationwide is On Your Side and Join the Nation are service marks of Nationwide Mutual Insurance Company. ©2013 Nationwide Mutual Insurance Company. All rights reserved. NPR-0501ML1 (01/13)


PNG Jewelers is coming to Folsom on
12th and 13th April, 2014
11:00am to 6:30pm
40% off MRP
all Diamond Jewelry
20% off MRP
all Gold Jewelry
at the Hilton Garden Inn
221 Iron Point Rd, Folsom, CA 95630
PNG Jewelers
Since 1832
www.pngjewelers.com
PNG Jewelers Inc. 820 E.El Camino Real,Sunnyvale CA 94087
Tel : (408) 245-6764
Email : info@pngjewelers.com
www.pngjewelers.com
* Offer not valid on purchase of Gold and Silver coins
* Local taxes applicable.